# भीषण अपघातात चांदुर बाजारचे दोन तरुण ठार

## अमरावती-नागपूर मार्गावर काटोलजवळ ट्रकवर आदळले थार वाहन





### दोन गंभीर जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार, ( दि.24 )**- नागपुर येथे एका लग्न समारंभात सहभागी होण्यासाठी जात असताना चांदूर बाजार येथील चार मित्रांच्या थार वाहनाला भरधाव आयशर ट्रकने धडक दिली. या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. ही घटना शनिवारी-रविवार च्या रात्री 1 वाजताच्या सुमारास घडली.

चांदूर बाजारचे माजी नगराध्यक्ष कै. नितीन कोरडे यांचा मुलगा सोपान कोरडे (वय 22 वर्ष) व वैभव उर्फ ऋषिकेश गावंडे (वय अंदाजे 23 वर्ष दोन्ही रा. चांदुर बाजार जि.अमरावती) असे मृत्यूमुखी पडलेल्या युवकांची नावे आहे. तर शुभम संजय खोंड (वय 21 वर्ष), अजिंक्य वाकोडे (वय 24 वर्ष दोन्ही रा. चांदुरबाजार जि. अमरावती) असे जखमींचे नावे आहेत. जखमींवर कोंढाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना नागपुरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची परिस्थिती धोक्याबाहेर असल्याची प्राथमिक माहिती आहे. हे तरुण प्रहारचे कार्यकर्ते होते. या घटनेमुळे प्रहारच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

### थार कार चकनाचुर


एमएच 27/ डीएल 8519 या क्रमांकाच्या महिंद्रा थार वाहनाने हे चौघे मित्र चांदूर बाजार येथून नागपूरला काही कार्यक्रमाला गेले होते. काटोलजवळ एमएच 40/ सीटी 0242 क्रमांकाच्या आयशर ट्रकची वेगवान थार ला जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की, यामध्ये थार वाहनाचा चेंदामेंदा झाला. अपघाताची माहिती मिळताच चांदूर बाजारातील नागरिक व मृतांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातामुळे संपूर्ण चांदूर बाजारात शोककळा पसरली आहे. सोपान आणि ऋषिकेश यांच्या अकाली निधनाने कुटुंबीय आणि स्थानिक रहिवाशी शोकमग्न झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चांदूर बाजारात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### रस्ता सुरक्षेसाठी पाऊले उचलावी

या मार्गावरील रस्ता सुरक्षेसाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. अशा घटना रोखण्यासाठी कडक नियमांची अंमलबजावणी आणि वाहतूक व्यवस्थापन सुधारण्याची गरज आहे, असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे.



ऋषिकेश गावंडे



सोपान कोरडे



# अब्दुल आकिब खून प्रकरणात तिघांना अटक

### 27 नोव्हेबरपर्यंत पोलीस कोठडी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 24 )** - साक्षगंध तोडल्याच्या कारणावरून 22 नोव्हेंबरच्या रात्री अब्दुल आकिब नामक तरुणाची मुलीकडील तीन जणांनी राजापेठ हद्दीतील प्रभादेवी मंगल कार्यालयाजवळ हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी सैय्यद अबजर (19), शेख अवेज (18) आणि डेनिअल अहमद (18) या तिन आरोपींना अटक केली आहे. न्यायालयाने तिन्ही आरोपींना 27 नोव्हेबरपर्यंतची पोलिस कोठडी सुनावली आहे.

राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुन्या बायपास रोडवर असलेल्या प्रभादेवी मंगल कार्यालयाजवळ अब्दुल आकिब नावाच्या तरुणाची हत्या करण्यात आली. या घटनेची तक्रार अब्दुल आकिबच्या आईने राजापेठ पोलीस ठाण्यात दिली. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, अब्दुल आकिबचे एका मुलीशी प्रेमसंबंध होते, सहा महिन्यांपूर्वी दोघांचीही एंगेजमेंट झाली होती. मात्र यादरम्यान अब्दुल आकिबच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने त्यांनी मुलीच्या कुटुंबीयांनी लग्न करण्यास नकार दिला, त्यानंतर अब्दुल आकिबने मुलीशी बोलणे बंद केले. दोन महिन्यांपूर्वी त्या मुलीचे दुसऱ्या तरुणाशी लग्न जुळले, परंतू ते लग्नही तुटले. त्यामुळे अब्दुल आकिब यांच्यामुळे लग्न मोडल्याच्या संशयावरून मुलीकडच्याकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या. असे अब्दुल आकिबच्या आईने तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपींचा शोध सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शनिवारी रात्री आरोपी सैय्यद अबजर, शेख आवेज आणि डेनिअल अहमद यांना अटक केली. तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्यांना 27 नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# सुलभा खोडके, रवी राणा, प्रताप अडसड मंत्री पदाच्या शर्यतीत







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** - महायुतीच्या गेल्या सरकारमध्ये आ.रवी राणा, बच्चु कडू आणि प्रविण पोटे यांची पालकमंत्री पदासाठी रस्सीखेच दिसून आली होती. आता पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीनंतर रवी राणा यांच्यासमोरील प्रविण पोटे व बच्चु कडू नावाचे दोन्ही अडथळे दूर झालेले आहे. महायुतीमधील मित्रपक्ष राष्ट्रवादीच्या सुलभा खोडके व भाजपचे निष्ठावान धामणगाव रेल्वे येथील अडसड घराण्याचे वारस प्रताप अडसड हे मंत्री पदाचे स्पर्धक म्हणून राणांसमोर उभे ठाकले आहे. या तिघांपैकी कुणाला मंत्री पद मिळणार याकडे संपुर्ण अंबानगरीचे लक्ष लागलेले आहे. शिवसेना फोडून भाजपने तयार केलेल्या नव्या सरकारमध्ये बच्चु कडू, तत्कालीन विधान परिषद सदस्य प्रविण पोटे व रवी राणा हे तिघेही अमरावतीच्या पालकमंत्री पदाकरिता इच्छुक होते. या रस्सीखेचेतून बच्चु कडू व रवी राणा वादाची ठिणगी पडली होती. वाद वणवा बनत असताना भाजप वरिष्ठांनी चंद्रकांत पाटील यांच्याकडे पालकमंत्री म्हणून अमरावती जिल्ह्याची अतिरिक्त जबाबदारी दिली होती. आता विधानसभा निवडणूका पार पडल्या, महायुतीला जनतेचा कौल मिळाला, विशेषत- भाजप बलाढ्य पक्ष ठरला. प्रस्थापितांमध्ये बच्चु कडू यांचाही पराभव झाला. प्रविण पोटेंची आमदारकी कधीचीच संपलेली आहे. असे असताना काही तासात बसणाऱ्या महायुतीच्या नविन सरकारमध्ये अजित पवार यांच्या निकवर्ती व तिसऱ्यांदा आमदार झालेल्या सुलभा खोडके मंत्री होतील, की सलग दुसऱ्यांदा आमदार झालेले प्रताप अडसड मंत्री होतील, की अनेक वर्षांपासून मंत्रीपदासाठी वाट पाहत असलेले महायुतीचे घटक असलेले रवी राणा यांची मंत्रीपदी वर्णी लागेल का ? हे पाहण्यासारखे राहील.

### कॅबिनेट पदाने होणार अंबानगरीचा सन्मान ?

### अमरावतीचे नवे पालकमंत्री कोण ?

# भाजी विक्रेत्याने घेतला सागवानाच्या वनात गळफास

## दंत महाविद्यालयाजवळील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 24 )**- फेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डेंटल कॉलेजजवळील सागवान वनात एका भाजी विक्रेत्याने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना 24 नोव्हेंबर रोजी सकाळी 7 वाजता उघडकीस आली. भीमराव दशरथ मोरे (52, रा. रामकृष्ण कॉलनी, अमरावती) असे आत्महत्या केलेल्या भाजी विक्रेत्याचे नाव आहे.



भीमराव मोरे भाजीविक्रीचा व्यवसाय करतात. भीमराव यांना दारूचे व्यसन आहे. 24 नोव्हेंबर रोजी पहाटे 4 वाजता ते भाजी बाजारात भाजी खरेदी करण्यासाठी निघाले. मात्र सकाळी सात वाजता वडिल घरी पोहोचले नाही, त्यामुळे भिमराव यांचा मुलगा आकाश मोरे यांनी बाहेर जाऊन बघितले असता, त्यांना वडील भीमराव मोरे यांनी डेंटल कॉलेजजवळील सागवान जंगलातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समजले. या घटनेची माहिती मिळताच आकाश तात्काळ घटनास्थळी पोहोचला. ही माहिती फेजरपुरा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी मृतदेह खाली उतरवून जिल्हा रुग्णालयात नेला. तेथे डॉक्टरांनी भीमराव यांना मृत घोषित केले. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. फेजरपुरा पोलिसांनी आकस्मिक घटनेची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# तडीपार आरोपीला चाकूसह अटक

### फेजरपुरा पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 24 )** - तडिपार आरोपीला चाकुची दहशत पसरवित असताना फेजरपुरा पोलिसांनी अटक केली. किरण नगर येथील रहिवासी राम अनिल जाधव (21) हा हद्दपार होऊनही शहरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे पोलिसांनी त्याला अटक करून त्याच्याकडून चाकू जप्त करण्यात आला. 24 नोव्हेंबर रोजी दुपारी 12.30 वाजता किरण नगरमध्ये ही कारवाई करण्यात आली.

फेजरपुरा पोलिसांचे पथक 24 नोव्हेंबर रोजी दुपारी पोलिस स्टेशन परिसरात गस्त घालत असताना, तडीपार राम जाधव हा आवारात चाकू घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून त्याला अटक केली. त्याच्याकडून एक चाकू जप्त करण्यात आला आहे. राम जाधव यांच्यावर आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू करण्यात आला आहे.

# मुस्लिमांनीही गायला 'एक है तो सेफ है' चा राग

## अलिम पटेलांच्या निसटत्या पराभवाने भ्रमाचा भोपळा फुटला









**■ रोहित गासे ■**

**अमरावती,( दि.24 )** - काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पुर्वीपासून %खरा सिक्का% मानत आलेल्या मुस्लिम वोट बँक ने यंदा त्यांच्या भ्रमाचा भोपळा फोडत आम्हीही भाजप सारखा 'एक है तो सेफ है' चा राग आवळत असल्याचे दाखवून दिले. आझाद समाज पार्टी (कांशीराम) चे उमेदवार अलीम पटेल मो.वहीम यांना विजयाचा व्दारापर्यंत पोहोचविले, मात्र त्यांच्या दुर्दैवाने त्यांचा निसटता पराभव ठरला. बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता यांनी जर फक्त 6 हजार मतं जास्त गिळले असते तर आज अमरावती मतदारसंघात मुस्लिम आमदाराचे नेतृत्व मिळण्याचा इतिहास ठरला असता.

लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी पाच मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीला मताधिक्य मिळाले होते. तर अमरावती विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे बळवंत वानखडे यांना सर्वाधित 25 हजारांची लीड देत विजय श्री खेचून आणला होता. इतिहास आहे की, अमरावतीचा आमदार बहुतांश वेळी हा पश्चिम अमरावतीमधील मुस्लिम बहुल मतांच्या भरवश्यावर विजयी झाला. विशेषत- काँग्रेस आमदाराच्या बाबतीत ते नेहमीच घडत आले. सन 2019 मध्ये काँग्रेसवर विजयी झालेल्या सुलभा खोडके यांचा यंदाच्या निवडणूकीतही मुस्लिम मतांवर डोळा होता. तसे विकासाचे नियोजनही त्यांनी पुर्वीपासून केले होते, त्यांचे पती संजय खोडके यांनी मुस्लिम मते आपल्याकडे वळविण्याकरिता साम, दाम, दंड, भेद असे सर्व प्रयत्न केले. दुसरीकडे यंदा काँग्रेसची तिकीट मिळाल्याने डॉ.सुनिल देशमुख नेहमीप्रमाणे मुस्लिम मतांच्या भरवशा स्वतःला 'सेफ झोन' मध्ये समजत होते. महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसची तिकीट असल्याने निदान 50 टक्के मते तरी आपल्याला पडतील असा ठाम विश्वास सुलभा खोडके यांचा होता, परंतू निकाल लागला आणि सर्वांच्या पायाखालची जमिनच सरकली. माझी-माझी म्हणत असलेली मुस्लिम वोट बँक ही मुस्लिम समाजातील सुशिक्षीत, जाणकार चेहरा अलिम पटेल यांची निघाली. सुलभा खोडके, सुनिल देशमुख आणि जगदीश गुप्ता प्रामुख्याने यांच्यात हिंदू व मुस्लिमेतर मतांचे विभाजन झाले, दुसरीकडे मुस्लिम व काही दलितांची गठ्ठा वोट बँक अलिम पटेल यांच्या पाठीशी उभी राहील्याने त्यांनी 54,591 मते मिळवित विजयाच्या दारात हजेरी लावली, मात्र ऐनवेळी काही भागातून सुलभा खोडके व सुनिल देशमुखांचे मते वाढल्याने फक्त 5 हजार 496 मतांनी त्यांचा पराभव झाला.

### काँग्रेसचा फाजील आत्मविश्वास

लोकसभेमध्ये संविधानाच्या मुद्द्यावर मुस्लीम, दलित मतदारांच्या ध्रुवीकरणाने काँग्रेसला तारले. पण, यावेळी हा मुद्दा निष्प्रभावी ठरला. लोकसभा निवडणुकीत अल्पसंख्याकांची एकगठ्ठा मते महाविकास आघाडीला मिळाली होती. यातूनच प्रचारात भाजपने 'मुस्लीम लांगूल चालना'च्या मुद्द्यावरून काँग्रेसला लक्ष्य केले. लोकसभेप्रमाणे मुस्लिमांची एकगठ्ठा मते मिळतील या आशेवर काँग्रेस नेते होते. परंतु असे एकगठ्ठा मतदान काँग्रेस वा महाविकास आघाडीला होऊ शकले नाही. लोकसभा निवडणुकीतील यशानंतर काँग्रेस नेत्यांमध्ये आलेला फाजील आत्मविश्वास, महाविकास आघाडीतील समन्वयाचा अभाव, महायुतीच्या प्रचारतंत्राला प्रत्युत्तर देण्यात आलेले अपयश यामुळे महाविकास आघाडीला जिल्ह्यात चांगली कामगिरी करता आली नाही. लोकसभा निवडणुकीतील यशामुळे हुरळून गेलेल्या काँग्रेसला या निकालाने जमिनीवर आणले हे तेवढेच खरे.

# कॅनमध्ये पेट्रोल न दिल्याने मॅनेजरला मारहाण

## वलगाव रोडवरील नायरा पेट्रोल पंपावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 24 )**- कॅनमध्ये पेट्रोल देण्यास नकार दिल्याने तीन तरुणांनी मॅनेजरला मारहाण केली. ही घटना 21 नोव्हेबर रोजी रात्री नागपुरी गेट हद्दीतील वलगाव रोड स्थित नायरा पेट्रोल पंपावर घडली. फैसल फुसरो फिरोज नैय्यर (44, रा. बिलाल कॉलनी) यांनी या घटनेची तक्रार 23 नोव्हेबर रोजी नागपुरी गेट पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी आसिफ कालीया (रा. सुफियाननगर), रिजवान नामक तरुण तसेच एका अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. फैसल फुसरो हे नायरा पेट्रोल पंपावर मॅनेजर म्हणून करतात. 21 नोव्हेबर रोजी रात्री ते कर्तव्य बजावत असताना, त्यांच्यासोबत दुसरे मॅनेजर ईम्रानउद्दीन काजी हे उपस्थित होते. दरम्यान आसिफ कालीया नामक तरुण तेथे आला आणि त्याने पेट्रोल



देणार्या कर्मचार्याला कॅनमध्ये पेट्रोल मागितले. त्यामुळे कर्मचार्याने याबाबत मॅनेजर फैसल फुसरो यांना दिली. त्यामुळे फैसल फुसरो यांनी आसिफला सांगितले की, कॅनमध्ये पेट्रोल देता येत नाही. त्यानंतर आसिफ कालियाने ॲम्ब्युलनचे पेट्रोल संपले, त्यात डेडबॉडी आहे, असे म्हणून मॅनेजरला शिविगाळ केली आणि कपडे काढून मारेल, अशी धमकी दिली. त्यावेळी रिजवान नामक तरुणासह त्याच्यासोबत असणार्या एका अनोळखीने मॅनेजर ईम्रानउद्दीन काजीला थापड्यांनी मारहाण केली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# विरोधकांच्या वज्रमूठी ने केले देवेंद्रांना परास्त

## लाडकी बहिण व विकासाचे कार्ड ठरले फेल

**विलास पाटील**

**वरुड,( दि.24 )** – मोर्शी विधानसभा मतदारसंघातील जनतेने महायुतीतीमधूल भाजप चे उमेदवार चंदू यावलकर यांना उच्चांकी मताधिक्याने निवडून दिले. या मतदारसंघात आतापर्यंत 'न भूतो' असा विकास केलेल्या देवेंद्र भुयारांना पराभवाचा धक्का बसला. देवेंद्रांच्या विरोधकांनी बांधलेल्या वज्रमुठीमूळे हे शक्य होवून मतदारसंघात परिवर्तनाची लाट निर्माण झाली. विकासाचे कार्ड आणि लाडकी बहीण योजने चे अस्त्र महायुतीमधील राष्ट्रवादीच्या भुयारांसाठी कुचकामी ठरले. महायुतीचे भाजपचे उमेदवार चंदू यावलकर यांच्यासाठी ते सरस ठरले.

वरुड–मोर्शी मतदार संघातील निवडणूक चुरशीची होईल आणि विजयी उमेदवाराचे मताधिक्य कमी राहील असा भल्याभल्यांचा अंदाज चुकवत चंदू यावलकरांचा एकतर्फी विजय झाला. लोकसभेत वर्धा मतदारसंघातील वरुड–मोर्शी





तालुक्यातील महायुतीचे उमेदवार रामदास तडस हे जरी पराभूत झाले असले तरी त्यांना या मतदारसंघात 16 हजार मतांची लीड होती. तोच कल विधानसभा निवडणुकीत कायम राहिला. महायुतीकडे मतदारांचा असलेला कल पाहून येथून अनेक जण इच्छुक होते. महायुतीच्या या जागेवर राष्ट्रवादी अजित पवार गटाने देवेंद्र भुयार यांच्यासाठी दावा केला होता, मात्र ही जागा भाजपाने माळी समाजाला द्यावी असा आग्रह धरत जोरदार रस्सी खेच सुरु झाली. त्यात यश येऊन अगदी शेवटच्या क्षणी ही जागा महायुतीमधील राष्ट्रवादी व भाजप या दोन्ही पक्षांना मैत्रीपुर्ण लढतीच्या नावावर सोडली. भाजपची उमेदवारी माळी समाजाचे चंदू यावलकर यांना देण्यात आली. अर्ज दाखल केल्यानंतरही स्वपक्षातील बंडखोरीचे आव्हान त्यांच्यासमोर होते.

त्यांनी बंडखोरांची मनधरणी करित त्यांना आपल्या बाजुने घेतले आणि अजित पवार गटाचे देवेंद्र भुयार यांच्यासोबत मैत्रीपूर्ण लढत दिली. दुसरीकडे महाविकास आघाडीने गिरीश कराळे यांना उमेदवारी दिली. तर विक्रम ठाकरे यांनी काँग्रेसशी बंडखोरीकरित आपली अपक्ष उमेदवारी दाखल केली. त्यामुळे या निवडणुकीत चौरंगी अशी लढत होणार अशी आशा होती परंतु ती एकतर्फी झाली.

### बरोबरीच्या चौरंगी लढतीत आश्चर्याचा धक्का

मोर्शी विधानसभा मतदारसंघात बरोबरीची चौरंगी लढत झालेली असताना चंदू यावलकर यांचा मताधिक्यांनी विजय होईल असा विचार कुणी स्वप्नातही केला नव्हता. त्यांच्या या विजयामुळे महाविकास आघाडीतील उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार सोबतच मैत्रीपूर्ण लढतीतील उमेदवार यांचे डिपॉझिट सुद्धा वाचू शकले नाही. याला काय म्हणावं असा प्रश्न मतदारांमध्ये निर्माण झाला आहे. एकीकडे लाडक्या बहिणीचा फायदा हा महायुतीतील मैत्रीपूर्ण लढतीत दोघांनाही होईल असे वाटत होते, परंतु तसे न होता केवळ भाजपाच्या उमेदवाराला झाला हे या निकालावरून स्पष्ट दिसून येत आहे.

### पुर्वीपासूनच भुयारांचा विरोध

देवेंद्र भुयार यांनी आमदारकीच्या काळात 4372 कोटी रुपयांचा मतदार संघात केलेल्या विकासाच्या मुद्द्यावर त्यांनी ही निवडणूक लढविली. हेच नेमके मतदारांच्या पचणी पडले नाही म्हणूनच की काय त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. सन 2019 च्या विधानसभा निवडणूकीमध्ये माजी मंत्री डॉ.अनिल बोंडे यांच्या विरोधात उभे असलेले देवेंद्र भुयार यांनी डॉ.बोंडे यांनी आपल्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगत आपल्या वाहनाची जाळपोळ झाल्याचे दर्शविले होते.त्या कारणाने सुरुवातीपासूनच आमदार भुयारांचा भाजपच्या कार्यकर्त्यांनी विरोधच केला. त्यात काँग्रेसही सहभागी झाली होती. पाचही वर्ष आमदारांना बदनाम करण्याचे प्रयत्न झाले. तो बदनामीचा कलंक पुसून काढण्यात भुयार हे अपयशी ठरले, याचाच परिणाम मतदारांवर पडला आणि भुयारांना पराभवाचा सामना करावा लागला असे म्हटले तर त्यात वावगे काही नसावे.

# महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादीवर ओढवली नामुष्की

### एकही जागा मिळविता आली नाही

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )** – शनिवारी विधानसभा निवडणुकीच्या निकालाने अनेकांना आर्श्चयाचा धक्का बसला आहे. अमरावती जिल्ह्यात आठपैकी सात जागा महायुतीच्या वाट्याला, तर एक जागा महाविकास आघाडीतील उद्धवसेनेच्या वाट्याला गेली आहे. मात्र महाविकास आघाडीतील मित्रपक्ष काँग्रेस आणि शरद पवार गटावर नाष्मुकी ओढविण्याची वेळ आली. त्यांना एकही जागा मिळविता आली नाही.

गत 2019 च्या विधानसभा निवडणुकीत अमरावती जिल्ह्यातून काँग्रेसचे तीन, दोन अपक्ष, दोन प्रहार तर एक भाजपचे आमदार निवडून आले होते. मात्र यंदा अमरावती जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांत निवडणुकीच्या प्रचारात लाडकी बहीण योजना, मतांच्या ध्रुवीकरणाला ब्रेक, एकसंघ महायुती आणि नुकत्याच लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांवर मात करून महायुतीचे नेते मतदारांच्या सामोरे जाताना दिसून आले. त्यामुळे अमरावतीत सुलभा खोडके, बडनेरात रवी राणा, धामणगाव रेल्वे प्रताप अडसड, मोर्शी चंदू यावलकर, अचलपूर प्रवीण तायडे, मेळघाट केवलराम काळे, अचलपूर राजेश वानखडे हे महायुती आणि दर्यापुरातून गजानन लवटे हे महाविकास आघाडीतून विजयी झाले.

यावेळी काँग्रेसने तिवसा, अचलपूर, धामणगाव रेल्वे, मेळघाट व अमरावती या पाच जागांवर निवडणूक लढविली. परंतु, एकही जागा जिंकता आली नाही. महाविकास आघाडीतून शरद पवार गटाने मोर्शीची जागा लढविली असली तरी गिरीश कराळे यांना मते फार कमी मिळाले.

उद्धवसेनेने बडनेरा आणि दर्यापूर या दोन जागा लढवित दर्यापुरातून गजानन लवटे हे एकमात्र महाविकास आघाडीतून विजयी झाले आहेत.



### बसपा, वंचित, मनसे उमेदवारांचाही अनपेक्षित पराभव

अमरावती मतदारसंघातून मनसेचे मंगेश उर्फ पप्पू पाटील यांनी 2545, तर बसपाच्या मेघा तायडे यांना 1167 9 मते मिळाली. बडनेरा मतदारसंघातून बसपाचे रमेश नागदिवे यांना 3502 मते मिळविली. मेळघाटातून बसपाचे मोतीलाल ठाकरे यांना 1593 मते, तिवस्यातून बसपाचे डॉ. मुकुंद डोणे यांना 1073 मते घेतली. तथापि, दर्यापुरातून वंचित बहुजन आघाडीचे अंकुश वाकपांजर यांनी 21 हजार 263 मते घेतली. अमरावतीतून वंचित बहुजन आघाडीचे राहुल मेश्राम यांनी 3048 मते घेतली. धामणगाव रेल्वे मतदार संघातून वंचितचे नीलेश विश्वकर्मा यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. एकंदर विधानसभा निवडणुकीत बसपा, वंचित, मनसे उमेदवारांनाही नाकारल्याचे चित्र आहे.

# य.च.महा.मुक्त विद्यापीठाचा संपर्क सत्र उद्घाटन सोहळा

## सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयात प्रारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.24 )**– श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित, महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय,वरूड येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अभ्यासकेंद्र क्रमांक 1261–अ यांचा शैक्षणिक वर्ष 2024–25 वर्षातील विद्यार्थी संपर्क सत्र उदघाट्न सोहळा दि.24 नोव्हेंबर (रविवार) रोजी पार पडला.

कार्यक्रमाची सुरूवात स्व. यशवंतराव चव्हाण व क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या उदघाट्नीय सोहळयाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रा.डॉ. एस. व्ही. सातपुते (ढ्ढन्न्ष्ट समन्वयक), प्रमुख उपस्थितीत केंद्रसंयोजक प्रा.डॉ.चत्रभूज कदम, प्रा.भूषण गावंडे, प्रा. बमनोटे, प्रा.चैताली गुर्जर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र संयोजक डॉ.चत्रभूज कदम यांनी केले. यावेळी त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यामधील नवीन शैक्षणिक धोरणानुसार होणारे बदल, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाच्या उपलब्ध सोयी सुविधा याबद्दल माहिती दिली.

प्रा.बमनोटे यांनी मुक्त विद्यापीठातील शिक्षणाचे महत्त्व सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. संजय सातपुते यांनी विद्यार्थ्यांनी सतत ज्ञानार्जन करून आपल्या जीवनात प्रगती करावी. त्याचबरोबर आपले व्यवसाय, नोकरी सांभाळून उच्च शिक्षण घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे महत्त्वाचे ज्ञान स्त्रोत आहे, असे म्हटले. तसेच विद्यार्थीनी निशा आंडे हिने अभ्यासकेंद्राविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन केंद्रसहायक प्रा. उमेश हिवरकर,तर आभार प्रा.भूषण गावंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभ्यास केंद्रातील समंत्रक प्रा.विजया फुटाणे, प्रा. प्रिती काकडे, प्रा. प्रणिता शंकरपाळे, प्रा.अंकिता सायनरे, प्रा.अर्चना ठेंगेवार, तंत्र सहायक यामीन शेख यांनी परिश्रम घेतले.




## तेरा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न

**अमरावती** – तेरा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक घटना तळेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत 21 नोव्हेबर रोजी उघडकीस आली. याप्रकरणात पिडित मुलीच्या तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी आरोपी प्रतिक गोकुळ घाटोळे (19) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पिडितेच्या तक्रारीनुसार, आरोपीने तिला शोकेस आले आहे, ते पाहायला नेतो, असे म्हणून घरी नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीवरून तळेगाव पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.

# राणांना अंजनगाव बारीत 72 टक्के तर पार्डी येथे 59 टक्के मतदान

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.24 )**– आ.रवि राणा यांना बडनेरा विधानसभा मतदारसंघात 1,27,800 मते मिळाली असुन ते 66974 मतांच्या लीड ने विजयी झाले आहे.

अंजनगाव बारीत विधानसभा निवडणुक 65 टक्के मतदान झाले असुन अंजनगाव बारीतील सहा मतदार केंद्रातून एकूण 5265 मतदान झाले, त्यापैकी 65 टक्के मते घेऊन रवी राणा यांनी विजय मिळविला तसेच जवळील पार्डी येथेही 71 टक्के मतदान झाले असुन एकूण 1201 मतांपैकी 700 एवढे भरघोस मते रवी राणा यांनी मिळाली आहे. अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांना 1001 तर तुषार भारतीय यांना 66 मते मिळाली आहे. तसेच ग्रामीण भागातील उतखेड, वडगाव जिरे, कस्तुरा, मोगरा,भानखेड (खु.), भानखेड( खु.), पोहरा,राजूरा, बोंडणा, पिंपळखुटा,इंदला, मासोद , वडगाव माहोरे, बोरगाव धर्माळे या ठिकाणीही रवी राणा यांना भरघोस मतदान पडल्याचे समजते.



## दिपक मदनेकर यांना मातृशोक

**अमरावती** – दीपक आणि संजय मदनेकर यांच्या मातोश्री श्रीमती सुधाताई दशरथ मदनेकर (वय 74वर्षे ) यांचे आज सकाळी 7 वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा त्यांचे राहते घर प्रवीण नगर, व्हीएमव्ही कॉलेजच्या मागे,अमरावती येथून उद्या सोमवार 24 नोव्हेंबर 2024 ला सकाळी 10 वाजता येथून हिंदू स्मशान भूमी करीता निघणार आहे.



# अंजनगाव बारीत रवी राणा यांच्या विजयाचा जल्लोष

### अभिनंदन, शुभेच्छांचा वर्षाव

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.24 )**– बडनेरा विधानसभा मतदार संघातील आमदार रवी राणा हे भरगच्च मतांनी चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल अंजनगाव बारीत एकप्रकारे जल्लोषाचे व उत्सवाचे वातावरण पहायला मिळाले. विजयाबद्दल गावातून ढोलताशे ,डि.जे.व फटाक्यांच्या आतिषबाजी करून गावातील चौकाचौकतून जयघोषात विजयी रॅंली काढून गुलालाची उधळण करून गावात विजयाचा जल्लोष मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अंजनगाव बारी येथील युवा स्वाभिमान पक्षाचे कार्यकर्ते सोमेश्वर इंगोले, सुधाकर हटवार,पांडुरंग खडसे, प्रकाश बेरड,भिमराव हरणे, प्रदिप तलवारे, नरेंद्र इंगोले, चंद्रकांत खडसे,विजय इंगोले, ज्ञानेश्वर मुळे, प्रदिप निचत,शरद इंगोले, सचिन गरुड, सिद्धोधन खडसे, प्रविण टवलारे, जगदीश अंबडकार, अरविंद निंबर्ते, रवी टवलारे, तेजस तेटू, सतिश फुसे , सतिश तेटू, दिनेश शिरसागर, संदिप डकरे, उमेश डकरे, सुनिल निचत, दिलीप डांगे, युवराज गभणे, रोशन गभणे, बाबाराव भांडे,दिपक गोंदे, शरद गाडेकर, सुदाम श्रीखंडे, अशोक तेटू, मयुर कुऱ्हाडे, सुधिर तेटू, ज्ञानेश्वर धामनकर तसेच गावातील तरुण युवा मतदार व नागरीक, महिलांनी रॅलीमध्ये सहभागी होऊन विजयामध्ये आपले अमुल्य योगदान दिले आहे. रवी राणा यांचा विजयाबद्दल गजेंद्र ढवळे, बाळासाहेब कुंभलकर, पवन इंगोले यांनी अभिनंदन केले असुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# पराभवाच्या निकालानंतर बच्चू कडू पुन्हा सेवाकार्यात!

## रात्री तीन वाजता अपघातग्रस्तांच्या भेटीसाठी नागपूर रवाना ▪ घटनेतील जखमींना दिला धीर

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.24 )**– 'सेवा हाच आमचा धर्म' हे ब्रीद घेऊन गेल्या पंचवीस वर्षांपासून बच्चू कडू रुग्णसेवेसह, गोरगरीब, वंचित घटकांसाठी काम करीत त्यांच्यासाठी जमिनीवरची लढाई लढत आहे. शनिवारी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि या निकालात बच्चू कडू यांचा पराभव झाला. मात्र पराभवाची चिंता न करता एका लढवय्या योध्दाप्रमाणे बच्चू कडू यांनी हसतमुखाने आपल्या सेवाकार्याला प्राधान्य देत काल रात्री अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना भेटण्यासाठी मध्यरात्री तडक थेट नागपूर गाठले आणि रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली व त्यांना धीर दिला.

राजकारणात जय पराजय चालतोच,मात्र शनिवारी लागलेल्या निकालाने सर्वांनाच धक्का बसला. राज्यातील असंख्य दिव्यांग, कामगार, शेतकरी, शेतमजुरांचा एकमेव हक्काचा आवाज असलेले बच्चू कडू यांना सुद्धा या पराभवाचा सामना करावा लागला.चार वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे बच्चू कडू यांचा पराभव झाल्यानंतर संपूर्ण राज्यातील कार्यकर्ते व चाहते दु:खी झाले.खुद्द बच्चू कडू यांना सुद्धा हा पराभव अविश्वसनीय होता, मात्र आपल्या पराभवाने खचून न जाता त्यांनी सर्वांना पुन्हा उठून उभे राहण्याचा व सेवा करण्याचा सल्ला दिला.

दरम्यान चांदूर बाजार येथील मित्रपरिवाराच्या नागपूरला एका लग्नसोहळ्याला उपस्थित राहण्याकरिता गेला असता काल मध्यरात्री एक वाजताच्या दरम्यान त्यांच्या चारचाकी वाहनाला कोंढाळी नजीक अपघात झाल्याची बातमी बच्चू कडू यांना माहिती पडताच त्यांनी रात्री साडे तीन वाजता आपल्या वाहनाने कोंढाली गाठले.या घटनेत सोपान नितीन कोरडे व ऋषिकेश गावंडे यांचा जागीच मृत्यू झाला तर अजिंक्य बाळासाहेब वाकोडे, ऋषिकेश खोंड हे दोघे जखमी झाले .बच्चू कडू यांनी आधी कोंढाली येथील रुग्णालयात जाऊन डॉक्टरांची भेट घेतली ,घटनेबाबत माहिती घेतली त्यानंतर लगेच नागपूर येथील खासगी रुग्णालय गाठून दोन्ही जखमींची आस्थेने विचारपूस करून त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना धीर दिला. तसेच डॉक्टरांना भेटून विशेष लक्ष देण्याची विनंती केली.

निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सुद्धा शांततेची झोप न घेता बच्चू कडू यांनी आपल्या सेवेला प्रथम प्राधान्य देऊन रुग्णसेवेला दिलेले महत्व यामुळे बच्चू कडू यांच्याप्रति जनसामान्यांमध्ये आणखी आदरभाव वाढला. जनतेने जो निकाल दिला तो स्वीकारून आपले जे सेवेचे कार्य आहे ते अविरत सुरू ठेवण्यासाठी बच्चू कडू हे पुन्हा नव्याने सज्ज झाले आहेत.



### कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये-बच्चू कडू

प्रहार चे कार्यकर्ते ही प्रहारची मोठी ताकद आहे. राजकारणात जय पराजय चालतच असतो, त्यामुळे कार्यकर्त्यांनी हा पराभव जिव्हारी लागता कामा नये. निकाल लागला, तो आपण सर्वांना मान्य करावा लागेल. काल प्रहार मधील दोन कार्यकर्त्यांचा अपघातात मृत्यू झाला, दोन कार्यकर्ते गंभीर जखमी आहेत. मला घटनेची माहिती मिळताच रात्री तीन वाजता मी कोंढाळी आणि नागपूर येथील रुग्णालयात जाऊन जखमींना भेटलो, त्यांना धीर दिला. दोन चांगले कार्यकर्ते या घटनेने मी गमावले याचे दु:ख आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये. आपण पुन्हा जोमाने कार्य करू आणि जनता जनार्दन आपल्याला पुन्हा संधी देईल. अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी यावेळी दिली.

# पाईप लाईनसाठी खोदलेला खड्डा बुजवितांना अनेक ठिकाणी लेव्हल नाही

## राम नगरमध्ये अर्ध्यावरच थांबले काम

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.24 )** – चांदूर रेल्वे शहरात पाण्याची नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असुन सदर खोदलेला खड्डा बुजवितांना अनेक ठिकाणी लेव्हलिंग करण्यात येत नसल्याचे नगरिकांचे म्हणणे आहे. तर राम नगरमध्ये तर गेल्या 8 दिवसांपासून सदर काम अर्ध्यावरच थांबलेले आहे. त्यामुळे सदर काम व्यवस्थित पुर्ण होण्यासाठी नगर परिषदेने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

चांदूर रेल्वे शहरात नवीन पिण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. यामुळे चांदूर वासीयांचा पाण्याचा प्रश्न मिटणार असुन शुध्द पाणी सुध्दा मिळणार असल्याचे समजते. मात्र सदर काम सुरू असतांना ते व्यवस्थित होणे सुध्दा महत्वाचे आहे. अनेक घरांसमोरून सदर पाईपलाईन टाकण्याकरीता खड्डा खोदून त्याचदिवशी बुजविण्यात सुध्दा येत आहे. मात्र बुजवितेवेळी व्यवस्थितपणे लेव्हलिंग होत नसल्याची नागरिकांची ओरड आहे. काही नागरिकांनी तर नाईलाजाने स्वतऱ्हून आपल्या घरासमोरील लेव्हलिंग केले. याशिवाय राम नगरमध्ये तर पाईपलाईप टाकण्याचे काम संबंधित कंत्राटदाराने अर्ध्यावर सोडून दिले. मागील 8 दिवसांपासून उर्वरित कामाकरीता ते राम नगरमध्ये फिरकलेच नाही. सदर काम व्यवस्थितपणे पुर्ण करून देण्याकरिता संबंधित कंत्राटदाराचे सुपरव्हायझर, नगर परिषदमध्ये नागरिकांनी तोंडी सांगितल्यावरही सदर काम जैसे थे आहे. त्यामुळे आता तरी नगर परिषद दखल घेणार का ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

